# नियमीत दिवाणी दावा क्रमांक २७/२०१५
## निशाणी ५ खाली आदेश
## (दिनांक २७ मे २०१५ रोजी पारीत केला )

१ प्रतिवादींनी वादीच्या दावा मिळकतीवरील कब्जेवहिवाटीस दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यत कसलाही हरकत अडथळा करु नये म्हणून तूर्तातूर्त मनाई हुकुम देण्यासाठी वादीने हा अर्ज दाखल केला आहे.

२ वादीचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे

वादी मोजे उंबरगाव तालुका पंढरपूर येथील गट क्र ६ या मिळकतीचे मालक आहेत. त्याच्या चतुसिमा खालील प्रमाणे

पूर्वेस : रस्ता

पश्चिमेला : गट क्र ५

दक्षिणेला : गट क्र ५

उत्तरेला : गट क्र २९४,२९५,२९७ आणि २९८

(या मिळकतीला दावा मिळकत असे संबोधण्यात येईल)

३ दावा मिळकत ही वादीच्या मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. मौजे उंबरगाव, तालुका पंढरपूर येथे निरा उजवा कालवा शाखा क्र ३ वरील वितरीका क्र ७ अ च्या कालव्याचे (कॅनॉल) काम करण्याचे ज्ञापन मुख्य अभियंता जल संपदा विभाग पुणे यांनी दिनांक ०८.०८.२०१४ रोजी दिले व त्यानुसार या कामाची निवीदा प्रतिवादी क्र ४ यांनी घेतली व सदरचे काम प्रतिवादी क्र ३ यांच्या देखरेखीखाली करण्याचे ठरले. या कामाबाबतची कसलीही नोटीस वादीस देण्यात आलेली नाही. तसेच वादीच्या मालकीचे किती क्षेत्र सदरील वितरीकेसाठी बाधीत होणार आहे या बाबत कसलाही खुलासा दिलेला नाही किंवा त्याबददलची भुसंपादनाची कसल्याही प्रकारची प्रक्रिया राबविलेली नाही. दावा मिळकतीमधून

वितरीकेचे कामकाज करण्याचा कसलाही आदेश नसताना प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या पश्चिमेकडून वळून पुढे दक्षिण बाजूने रस्त्याच्या जवळून पुढे वादीच्या राहत्या घराच्या मागील बाजूने सदर वितरीकेचे कामकाज करण्याची तयारी सुरु केली आहे. त्यानुसार प्रतिवादींनी वादीच्या जमीनीत सुमारे १० फूट खोल चर पाडलेला आहे. त्यात वादीचे सुमारे २० गुंठे क्षेत्र वाया गेले असून त्याचे अंदाजे १५ लाख रुपयाचे नुकसान झाले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र ४ हा उपरोक्त खोदलेल्या चरी ऐवजी दावा मिळकतीच्या दुसऱ्या क्षेत्रातून वितरीकेचे काम करणार असल्याचे वादीस समजले.

४ वास्तविक पाहता सदरची वितरीका वादीच्या क्षेत्रातून जात नव्हती. तरीदेखील वादीने नुकसान सहन करुन वितरीकेसाठी जागा उपलब्ध करुन दिली. त्यावेळी वादीच्या जमीनीतील उभ्या पिकाचे व बोरीच्या बागेचे नुकसान झाले आहे. प्रतिवादी क्र ४ हा बळजबरीने दावा मिळकतीमध्ये वादीच्या संमतीविना वितरीकेच्या कामकाज करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे वादीच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादीनी वादींच्या दावा मिळकतीवरील कब्जेवहिवाटीस कसलाही हरकत अडथळा करु नये यासाठी हा तुर्तातूर्त मनाई चा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

५ प्रतिवादी क्र १ तर्फे हजर होउनही कसलेही म्हणणे सादर करण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र १ विरुध्द सदरचा अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

<u>६</u> <u>प्रतिवादी क्र २ व ३ तर्फे अर्जास संक्षिप्त म्हणणे निशाणी</u>

२५ नुसार खालील प्रमाणे

७ सदर प्रतिवादींच्या कथनानुसार निरा उजवा कालवा, त्यावरील शाखा कालवे व वितरीका ही ८० वर्षापूर्वीची ब्रिटीश कालीन सिंचन प्रणाली आहे. निरा उजवा कालवा शाखा क्र ३ वरील वितरीका क्र ७ अ ही फार वर्षापूर्वी तयार केलेली आहे. या वितरीकेतून येणाऱ्या पाण्याचा वापर हजारो शेतकरी करीत होते व आहेत. बऱ्याच वर्षापासून सदरच्या वितरीकेचे दुरुस्तीचे काम झालेले नव्हते. त्यामुळे प्रतिवादी क्र १ महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ०३.०३.२०१२ रोजीच्या निर्णयानुसार सदर वितरीकेच्या दुरुस्ती प्रस्तावास मंजूरी दिली. त्या प्रमाणे उपरोक्त काम पूर्ण करणे ही या प्रतिवादीची जबाबदारी आहे. दिनांक ०३.०३.२०१२ रोजीच्या निर्णयानुसार या प्रतिवादींनी वितरीका क्र ७ अ च्या दुरुस्तीच्या कामाचे टेंडर जाहिर करुन दुरुस्तीचे काम ठेकेदाराने चालू केले आहे. हे दुरुस्तीचे काम दावा मिळकतीपर्यंत झाल्यानंतर वादीने हरकत घेतल्यामुळे ते थांबविण्यात आले. व दावा मिळकतीच्या पुढील काम चालू ठेवण्यात आले व ते अंतिम टप्प्यात आहे.

८ गट क्र ६ मधून जाणारी वितरीका ही १०.५० मीटर रुंदीची आहे त्यामध्ये ३.६० मीटर हे सर्व्हिस रोडसाठी व आय. टी. साईटसाठी १.५० मीटर ठेवण्यात आलेले असून कालव्याची रुंदी ५.२० मीटर आहे. या कालव्याचे केवळ दुरुस्तीचे काम होणार असल्यामुळे नव्याने भुसंपादन करण्याचा व नुकसान भरपाई देण्याचा प्रश्नच उदभवत नाही. वितरीका क्र ७ अ च्या दुरुस्तीचे काम दावा मिळकतीपर्यंत आल्यानंतर असे लक्षात आले की, सदरची पूर्व नियोजित वितरीका ही दावा मिळकतीमध्ये बुजविलेली आहे व दाव्यामध्ये नमूद केलेला चर वादीने त्याच्या सोईसाठी दुसऱ्या मार्गाने तयार केलेला आहे. सदरचा चर प्रतिवादींनी कधीही खोदलेला नाही. त्यामुळे याबाबत नुकसान भरपाई मागण्याचा वादीस कसलाही हक्क, अधिकार नाही.

वितरीका क्र ७ अ चे शासन परिपत्रकान्वये दुरुस्तीचे काम सुरु झालेले असल्यामुळे नव्याने कसलीही जमीन संपादन करण्याची नाही. तसेच कॅनॉलच्या दुरुस्तीशिवाय दुसऱ्या मार्गाने चर पाडण्याचे कसलेही प्रयोजन नाही. सदरची वितरीका ही नकाशामध्ये अस्तित्वात असल्याप्रमाणेच होणार आहे. उपरोक्त वितरीका क्र ७ अ चे कामकाज हे शेतकऱ्यांच्या हितासाठीच होणार आहे व त्याचा उपयोग या शेतकऱ्यांच्या शेतजमीनीला पाणी देण्यासाठी होणार आहे. उपरोक्त दुरुस्तीचे कामकाज थांबविल्यास या सर्व शेतकऱ्यांचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती या प्रतिवादींतर्फे करण्यात आली.

९ प्रतिवादी क्र ४ यांच्यावर समन्सची बजावणी देखील ते गैरहजर राहिले. त्यामुळे दावा एकतर्फा चालविण्यात यावा असा आदेश निशाणी १ खाली करण्यात आला.

१० प्रकरणाची कागदपत्रे अभ्यासली. वादींचे विद्वान वकील श्री एम. इकारे तसेच प्रतिवादी क्र २ व ३ यांचे विदवान वकील श्री एस. एल. साठे यांचा युक्तिवाद ऐकला. त्यावरून मी खालील मुद्दे निश्चीत केले आहेत. त्यांचे उत्तरे मी सकारण खालीलप्रमाणे दिलेली आहेत.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | वादींच्या हक्कात प्रथमदर्शनी प्रकरण आहे काय ? | ... | **‘‘नकारार्थी’’** |
| २. | न्यायाचे संतुलन कोणाच्या बाजूने आहे ? | ... | **‘‘प्रतिवादींच्या’’** |
| ३. | तूर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर केल्यास कोणाचे अपरिमीत नुकसान होईल ? | ... | **‘‘प्रतिवादींचे’’** |
| ४. | काय आदेश ? | ... | **‘‘अंतिम आदेशाप्रमाणे** |

## *: कारणे मिमांसा :*

**मुददा क्र १ साठी**

११. वादी या दावा मिळकतीच्या मालक असून त्यांची दावा मिळकतीवर कब्जेवहिवाट आहे, ही बाब वादातीत आहे. तसेच प्रतिवादी क्र. ४ हे शासकीय ठेकेदार असून प्रतिवादी क्र. ३ यांच्या मागदर्शनाखाली व देखरेखीमध्ये नीरा उजवा कालवा शाखा क्र. ३ वरील वितरीका क्र. ७ अ या बाबतचे दुरुस्तीचे कामकाज प्रतिवादी क्र. १ महाराष्ट्र शासन यांच्या आदेशानुसार करीत आहे, ही बाबदेखील वादातीत आहे. वादीने निशाणी ४ सोबत सादर केलेल्या दि. ०४.०२.२०१४ रोजीच्या प्रतिवादी क्र. ४ यांना दिलेल्या कार्यारंभ आदेशावरुन ही बाब स्पष्ट होते. तसेच प्रतिवादी क्र. ४ हे उपरोक्त वितरीकेच्या कालव्याचे(Canal) खोदकाम व इतर कामकाज दावा मिळकतीवरुन करणार आहेत ही बाबदेखील प्रतिवादींना मान्य आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार वितरीका क्र. ७ अ ही ब्रिटीशकालीन असून ती दावा मिळकतीवरुन याअगोदरच अनेक वर्षांपासून गेलेली आहे तर वादींच्या कथनानुसार अशाप्रकारची वितरीका दावा मिळकतीवरुन कधीही जात नव्हती आणि प्रतिवादी हे काम कसलेही भूसंपादन न करता, करत असल्यामुळे ते बेकायदेशीर आहे आणि हाच वादाचा विषय आहे.

१२. वितरीका क्र. ७ अ ही ब्रिटीशकालीन असून अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे आणि या वितरीकेचे केवळ दुरुस्तीचे कामकाज करण्यात येत आहे, ही बाब सिध्द करण्यासाठी प्रतिवादी क्र. ४ यांनी निशाणी ३० सोबत नीरा उजवा कालवा शाखा क्र. ३ व वितरीका क्र. ७ अ बाबत पंढरपूर पाटबंधारे उपविभाग यांच्यामार्फत जारी करण्यात आलेल्या नकाशची सत्यप्रत सादर केले आहे. त्यानुसार उपरोक्त वितरीका पुर्वापार अस्तित्वात असून ती मौजे उंबरगाव, बोहाळी इत्यादी गावाच्या शेतजमीनीतून जात असलेली दिसते तसेच उपरोक्त वितरीका अनेक वर्षापासून या भागात अस्तित्वात असल्याबाबतची शपथपत्रे मौजे

उंबरगाव व बोहाळी येथील शेतक—यांनी निशाणी ३१ ते ३६, ३६अ व ब नुसार प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्यातर्फे सादर केलेले आहे. त्यानुसार देखील उपरोक्त वितरीका अनेक वर्षापासून अस्तित्वात असल्याबाबत व त्याद्वारे मौजे उंबरगांव व बोहाळी व इतर गावातील शेतक—यांना त्याचा पाणीपुरवठयासाठी उपयोग होतो असे दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र. १ महाराष्ट्र शासन यांचा दि. ०३.०३.२०१२ रोजीचा निशाणी ३० सोबतचा शासननिर्णय पाहता उपरोक्त नमूद वितरीका क्र. ७ अ ही ब्रिटीशकालीन सिंचनप्रणाली असून तिच्या लाभक्षेत्रामध्ये मौजे उंबरगाव व बोहाळी गावामध्ये पाणीवापर संस्था स्थापन झालेली आहे आणि ४७२ हेक्टर क्षेत्रास या वितरीकेमुळे सिंचनाचा लाभ होतो असे त्यात नमूद करण्यात आलेले आहे. या वितरीकेमधून मोठया प्रमाणात गळती होत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने या वितरीकेच्या दुरुस्तीस व त्याबाबतच्या येणा—या खर्चास मान्यता दिलेली आहे असे या दि. ०३.०३.२०१२ रोजीच्या शासननिर्णयावरुन दिसून येते. त्यामुळेच उपरोक्त नमूद वितरीका ही ब्रिटीशकालीन असून अनेक वर्षापासून अस्तित्वात आहे ही बाब स्वयंस्पष्ट आहे.

१३. वादीचे असेही कथन आहे की, उपरोक्त वितरीका दावा मिळकतीमधून कधीही जात नव्हती आणि त्यामुळेच प्रतिवादी क्र. १ यांनी कायदेशीररित्या भूसंपादन केल्याखेरीज त्यांना दावा मिळकतीमध्ये कसलेही कामकाज करता येणार नाही. यासाठी वादीने निशाणी ३८ सोबत दि. १२.०३. १९९९ रोजी दावा मिळकत खरेदी केल्याबाबतचे खरेदीखताच्या प्रति निशाणी ३८ सह सादर केलेला आहे. त्यांच्या कथनानुसार या खरेदीखतामध्ये दावा मिळकतीवरुन कालवा जात असल्याबातचा कसलाही उल्लेख नाही तसेच निशाणी ४ सह सादर केलेल्या दावा मिळकतीच्या वर्ष २०१४—१५ मधील ७/१२ च्या उता—यामध्येदेखील कालव्याचा कसलाही उल्लेख नाही. तसेच सोबत जोडलेल्या भूमिअभिलेख यांच्या नकाशामध्येदेखील याबाबत उल्लेख नाही. आणि महत्वाचे

म्हणजे जमीनीच्या मूळ मालकांपैकी एक शिवाजी भोसले यांनी निशाणी ४३ हे शपथपत्र दाखल केलेले असून त्यांच्या मिळकतीमधून कोणताही कालवा गेलेला नाही असे नमूद केलेला आहे या सर्व पुराव्यावरुन दावा मिळकतीमधून कोणताही कालवा गेलेला नव्हता हे सिध्द होते असे वादीचे कथन आहे.

दावा मिळकतीच्या खरेदीखतामध्ये तसेच दावा मिळकतीच्या चालू वर्षाच्या ७/१२ उता—यामध्ये कालव्याचा उल्लेख नाही ही बाब दिसून येते. तसेच दावा मिळकतीच्या मूळ मालकापैकी एक शिवाजी भोसले यांनी निशाणी ४३ नुसार शपथपत्राद्वारे दावा मिळकतीवरुन कसलाही कालवा गेलेला नाही असे नमूद केल्याचे स्पष्ट दिसते. मात्र यापार्श्वभूमीवर वादीनेच निशाणी २८ सह सादर केलेले दावा मिळकतीचे वर्ष २००७—०८ ते वर्ष २००८—०९ पर्यंतचे ७/१२ चे उतारे पाहता त्यामध्ये काही क्षेत्र 'पड' दाखविण्यात आले असून या उता—याच्या रकाना क्र. १५ मध्ये विहीर व कॅनॉल यांचा उल्लेख केलेला असल्याचे दिसून येते. तसेच दावा मिळकतीचे दुसरे मूळ मालक ज्ञानेश्वर भोसले यांनी निशाणी ३१ नुसार शपथपत्र सादर केले असून वादीला दावा मिळकत विक्री केली त्यावेळी दावा मिळकतीमधून वितरीका क्र. ७ अ चा कालवा गेलेला होता आणि ही वितरीका पुढे बोहाळी येथे गेलेली आहे आणि लगतचे शेतकरी या वितरीकेचा व कालव्याचा वापर त्यांच्या शेतीला पाणीपुरवठयासाठी करत असत असे नमूद केलेला आहे. एकंदरीत प्रतिवादींनी सादर केलेला लेखी पुरावा व शपथपत्रे आणि वादीने सादर केलेला पुरावा पाहता या साक्षीदाराचे कथन अधीक विश्वासार्ह वाटते

१४. महत्वाचे म्हणजे वादीनेच मौजे उंबरगाव येथील शेतकरी महादेव गणपत गायकवाड व हरीदास विठोबा पवार यांची शपथपत्रे अनुक्रमे निशाणी ३९ व ४० वर सादर केलेली आहे. या दोन्ही शपथपत्रामधील परिच्छेद ४ नुसार वितरीका क्र. ७ अ ही २५ वर्षांपासून गट क्र. ६ मधून दक्षिण—उत्तर पश्चिम भागाकडून पुढे उंबरगावकडे गेलेली आहे मात्र ती बोहाळीकडे गेलेली नाही असे नमूद करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे वादीच्याच साक्षीदारचे कथन हे

वादपत्रातील कथनाशी पुर्णपणे विसंगत आहे. आणि त्यांच्याच कथनावरुन उपरोक्त वितरीका निश्चीतच गट क्र. ६ मधून जाते हे स्पष्ट झालेली आहे. उपरोक्त वितरीकेच कालवा बोहाळीकडे जातो किंवा नाही हे सिध्द करण्यासाठी प्रतिवादींनी श्री. स्वामी समर्थ सहकारी पाणी वापर संस्था, बोहाळी यांचा दि. ०१.०३.२०१२ ते २८.०२.२०१७ या कालावधीचा करारनामा सादर करण्यात आला आहे. त्यामध्ये वितरीका क्र. ७ अ मधील पाणीवापरासंबंधात हा करार असून बोहाळी येथील २०० ते २५० लाभधारक शेतक—यांना याचा लाभ होणार आहे व त्यातून १३० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे असे दिसते. तसेच प्रतिवादींनी निशाणी ३० सोबत नीरा उजवा कालवा विभाग, मौजे बोहाळी येथील लाभधारक शेतक—यांचे संदर्भातील आकारणीपत्रांच्या अनेक प्रती सादर केलेल्या आहेत. त्यानुसार वितरीका क्र. ७ अ चा वापर बोहाळी येथील शेतक—यांच्या पाणीपुरवठयासाठी करण्यात येतो ही बाब अधिकच स्पष्ट होते. तसेच  प्रतिवादींनी निशाणी ३० सह सादर केलेल्या नकाशानुसार दावा मिळकतीमधून वितरीका क्र. ७ अ चा कालवा जातो आणि पुढे तो बोहाळी या गावाकडे जातो हे स्पष्ट होते. तसेच ही बाब प्रतिवादींतर्फे सादर करण्यात आलेल्या शेतक—यांच्या शपथपत्रावरुन व पुराव्यावरुन सिध्द झालेली आहे त्यामुळेच नीरा उजवा कालवा शाखा क्र. ३ याची वितरीका क्र. ७ अ ही ब्रिटीशकालीन असून अनेक वर्षांपसून अस्तित्वात आहे आणि याचा कालवा दावा मिळकतीमधून बोहाळीकडे जातो ही बाब प्रतिवादींनी सिध्द केलेली आहे.

१५.  एकंदरीतच प्रकरणाच्या वस्तूस्थितीवरुन आणि उपरोक्त नमूद शासननिर्णयावरुन असे दिसते की उपरोक्त वितरीका अत्यंत जुनी असल्यामुळे आणि पाणीगळतीचे प्रमाण वाढल्यामुळे लाभक्षेत्रातील शेतक—यांना सिंचनाला बाधा येत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने वर्ष २०१२ या वर्षी उपरोक्त वितरीकेच्या दुरुस्तीसाठी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसारच प्रतिवादी क्र. ४ यांने शासकीय

अधिका—यांच्या म्हणजेच प्रतिवादी क्र. ३ यांच्या देखरेखीखाली या वितरीकेच्या केवळ दुरुस्तीचे कामकाज चालू केलेली आहे असे दिसते. तसेच या दुरुस्तीचे कामकाज दावा मिळकत वगळता इतर सर्व शेतातून जवळपास पूर्ण झालेली दिसते. उपरोक्त शेकडो शेतक—यांपैकी वादी वगळता एकाही व्यक्तीने उपरोक्त दुरुस्तीस आक्षेप घेतलेला दिसत नाही. याआधीच नमूद केल्याप्रमाणे दावा मिळकतीमधून उपरोक्त कालवा जातच नव्हता व नाही हे वादीचे कथन चूकीचे असल्याचे सिध्द झालेले आहे. प्रतिवादी हे केवळ या वितरीका क्र. ७ अ ची दुरुस्ती करत आहेत असे दिसते. सदर वितरीका अनेक वर्षांपासून अस्तित्वात असून या सिंचनप्रणालीचा मौजे उंबरगाव व बोहाळी या गावातील शेतकरी लाभ घेत आहेत. त्यामुळेच या सर्व जमिनींचे वेगळे भूसंपादन करण्यात आलेले नाही. तशी मागणीदेखील कोणत्याही शेतक—याने केलेली नाही. पुर्वापार अस्त्विात असलेल्या वितरिकेच्या कालव्याची केवळ दुरुस्ती करण्यात येत असल्यामुळे दावा मिळकतीमधून अगोदरच गेलेल्या कालव्याचे क्षेत्राचे वेगळे भूसंपादन करण्याची कसलीही गरज दिसून येत नाही.

वादीचे विद्‌वान वकिल श्री. एम. जे इकारे यांनी सन्माननिय ओरिसा उच्च न्यायालयाचा *ध्रुबा चरण परिदा विरुध्द स्टेट ऑफ ओरिसा हा ए.आय.आर. २००३ पान २१९* हा अधिनिर्णय सादर केला आणि युक्तीवाद केला की, सरकारला कोणतीही जमीन बळजबरीने संपादन करण्याचा कसलाही अधिकार नाही व कायदेशीर मार्गाने संपादन केल्यानंतरच नागरीकांच्या मिळकतीमध्ये त्यांना हस्तक्षेप करता येईल. मात्र प्रस्तुत प्रकरणाची वस्तुस्थिती व अधिनिर्णयातील वस्तुस्थिती यामध्ये तफावत आहे. प्रस्तुत प्रकरणी दावा मिळकतीमधून कालवा हा अनेक वर्षापासून जात आहे. महाराष्ट्र शासन केवळ या वितरीकेची दुरुस्ती करीत आहे व वादी वगळता इतर अनेक शेतक—यांपैकी कोणीही यास आक्षेप घेतलेला नाही. महत्वाचे म्हणजे वादीनेच या दुरुस्तीकामी सर खोदण्यास परवानगी दिली होती असे त्याचे वादपत्रात कथन आहे. त्यामुळेच वेगळे भुसंपादन करण्याची गरज नसल्यामुळे उपरोक्त अधिनिर्णण्यातील सारांश या प्रकरणाच्या वस्तुस्थितीला लागु

नाही. प्रतिवादी हे कायदेशीररित्या वितरीकेच्या दुरुस्तीचे कामकाज करत असल्यामुळे उपरोक्त कामकाजामुळे लाभक्षेत्रातील शेकडो शेतक—यांच्या जमीनीला सिंचनाचा लाभ होणार असल्यामुळे सदर कामकाज दावा मिळकतीमधून करण्यात येवू नये ही वादीची मागणी न्यायसंगत दिसून येत नाही. त्यामुळेच प्रथमदर्शनी प्रकरण हे वादीच्या हक्कात नाही. त्यामुळेच मी मुद्दा क्र. १ चे उत्तर *''नकारार्थी''* देतो.

**<u>मुददा क २ साठी</u>**

१६. मुद्दा क्र. १ चे नकारार्थी निष्कर्ष पाहता व उपरोक्त नमुद वितरीकेच्या दुरुस्तीचे कामकाज प्रतिवादी कायदेशीररित्या करीत असल्यामुळे व त्याचा लाभ वादीसह मौजे उंबरगाव व बोहाळी येथील शेकडो शेतक—यांना होणार आहे. त्यामुळे न्यायाचे संतुलन निश्चितच प्रतिवादींच्या हक्कात आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ चे उत्तर *''प्रतिवादींच्या हक्कात''* असे देतो

**<u>मुददा क ३</u>** <u>साठी</u>

१७. प्रतिवादी हे वितरीकेच्या दुरुस्तीचे कामकाज दावा मिळकतीवरुन कायदेशीररित्या करीत आहेत असे दिसते. सदर वितरीकेचा कालवा दावा मिळकतीमध्ये अनेक वर्षांपासून अस्तित्वात होता आणि त्याच्या दुरुस्तीमुळे उपरोक्त सिंचनप्रणाली अधीक कार्यक्षम होणार आहे. याआधीच नमूद केल्याप्रमाणे या दुरुस्तीमुळे कार्यक्षम पध्दतीने होणा—या पाण्याच्या वाटपामुळे मौजे उंबरगाव व बोहाळी येथील शेतकरीच नव्हे तर वादीला देखील लाभ होणार आहे. याआधीच नमूद केल्याप्रमाणे उपरोक्त वितरीकेच्या कालव्याच्या दुरुस्तीचे कामकाज केवळ दावा मिळकतीमधील भाग वगळता जवळपास पूर्ण झालेले आहे. आता हे कामकाज स्थगित करण्याचा आदेश दिल्यास उपरोक्त नमूद शेकडो शेतक—यांचे व अनेक हेक्टर शेतजमीनीचे योग्य त्या सिंचनाअभावी नुकसान होईल. पर्यायाने महाराष्ट्र शासनाचे म्हणजेच प्रतिवादींचे अपरिमीत नुकसान होईल. त्यामुळे मी

मुद्दा क्र. ३ चे उत्तर *'प्रतिवादींचे'* असे देतो

**<u>मुददा क ४ साठी</u>**

१८. मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष पाहता वादीचा तूर्तातूर्त मनाईसाठीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करणे न्यायसंगत राहिल. त्यामुळे मी मुद्दा क्र. ४ चे उत्तर खालील आदेशानुसार देत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज निशाणी ५ खर्चासह नामंजूर करण्यात आला.

दिनांक — २७.०५.२०१५

(हे. भा. सिरसाळकर)
**दिवाणी न्यायाधिश व स्तर,**
**पंढरपूर**